**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**नियम 289 अन्वये प्रस्तावासंबंधी**

**उपसभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव देण्यात आले आहेत. त्यामध्ये सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे आणि चंद्रकांत पाटील यांचा पहिला प्रस्ताव आहे. प्रस्तावाचा विषय "ठाणे जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका, सिडको, म्हाडा, वन खाते या प्राधिकरणाच्या आरक्षित भूखंडावर बांधण्यात आलेल्या घरांना अतिक्रमण ठरवून त्या तोडण्याच्या नोटिसा देणे" असा आहे. माननीय सदस्यांनी यासंबंधी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, संपूर्ण ठाणे जिल्हयात सात महानगरपालिका, नगरपालिका, सिडकोच्या व वन खात्याच्या शासकीय जमिनीवर फार मोठया प्रमाणात अतिक्रमणे होऊन अनधिकृत बांधकामे झाली आहेत. या बांधकामांची संख्या 4 लाखापेक्षा अधिक असून ही सर्व बांधकामे तोडण्यासंदर्भात शासनाने भूमिका स्वीकारली आहे. सभापती महोदय, सद्या पावसाळी दिवस असल्यामुळे ही बांधकामे तोडल्यानंतर साधारणपणे 25 लाख लोक बेघर होणार आहेत. ही बांधकामे तोडण्याबाबत शासनाने अत्यंत कडक कारवाई करण्याची भूमिका स्वीकारली आहे. या एकूण परिस्थितीचा विचार केला तर या अनधिकृत घरामध्ये राहणारी सर्व गरीब माणसे आहेत. त्यामध्ये झोपडपट्टयांमधील माणसांचा समावेश आहे. या संदर्भात शासनाने तातडीने काही तरी उपाय योजना करुन या सर्व लोकांना संरक्षण देण्याची गरज आहे. आज त्यांचा काहीही दोष नसतांना त्यांना बेघर करण्यात येत आहे. त्याबाबत शासनाने तातडीने उपाय योजना करण्याकरिता या सभागृहाचे कामकाज बाजूला ठेवून या महत्वाच्या विषयावर चर्चा करावी अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर व रामनाथ मोते यांनी नियम 289 अन्वये दिलेली सूचना अत्यंत महत्वाची व गंभीर स्वरुपाची आहे. या घरांच्या संदर्भात शासनाने निर्णय दिला असला तरी 25 लाख लोकांच्या घरांचा प्रश्न असल्यामुळे त्यांचे पुढील भवितव्य काय असा प्रश्न आहे? त्यासाठी निश्चितपणे विचार करण्याची गरज निर्माण झाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर.....

आहे. या प्रश्नाबाबत माननीय न्यायालयाने जरी निर्णय दिला असला तरी त्यांची पर्यायी व्यवस्था झ ाली पाहिजे. ती व्यवस्था झाल्याशिवाय त्यांच्या झोपडया तेथून पाडण्यात येऊ नयेत. किंवा पर्यायी जागा दिल्याशिवाय त्यांना त्या जागेवरुन स्थलांतरीत करु नये.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

असा विषय असल्यामुळे या विषयावर या सभागृहात चर्चा करावी आणि सरकारने 25 लाख लोकांना निश्चितपणे आश्वस्त करावे अशा प्रकारची मागणी या सूचनेमध्ये केलेली आहे. यासंबंधात या सभागृहात किमान तास-दीड तास चर्चा झाली पाहिजे अशा प्रकारची आमची मागणी आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये मोठे संकट आल्या सारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज सकाळी या ठिकाणी जवळ जवळ एक लाख लोकांचा मोर्चा कलेक्टर ऑफिसवर गेला होता. मी त्या मोर्चातूनच या ठिक्राणी आलो आहे. आतापर्यंत जवळ जवळ 90 हजार लोकांना नोटिसा दिल्या गेल्या आहेत. साडे चार लाख घरे शासकीय आणि एम.आय.डी.सी.च्या जागेवर आहेत. जवळ जवळ 20 ते 25 लाख लोकांचा प्रश्न या जिल्हयामध्ये निर्माण झालेला आहे. त्यामुळे लोकांमध्ये आक्रोश आणि अस्वस्थता निर्माण झालेली आहे. या ठिकाणी गोरगरीब आणि कामगार राहतात. त्यामुळे हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. शासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. या ठिकाणच्या लोकांमध्ये घबराहट आहे. अनेक लोक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालेले आहेत.काही लोक आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीमध्ये आहेत. अशा प्रकारची अवस्था या जिल्हयामध्ये निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रात केवळ या एकटया जिल्हयामध्ये अशा प्रकारचा हा एक न्याय एका बाजूला आणि दुसरा न्याय दुसऱ्या बाजूला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे अशा प्रकारच्या या गंभीर विषयावर दिवसाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे. हा 20 ते 25 लाख लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्याबाबतीत या सभागृहामध्ये चर्चा व्हावी अशा प्रकारचे निवेदन मी या द्वारे करीत आहे.

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भात सन्मानीय विरोधी पक्ष नेत्यांनी एका वेगळया चर्चेची मागणी केलेली आहे. वेगळी चर्चा घडवून आणण्यास माझी हरकत नाही. परंतु सभागृहाच्या आजच्या कामकाजामध्ये हा प्रस्ताव नसल्यामुळे सभागृहाचे संपूर्ण कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करता येणार नाही. म्हणून हा प्रस्ताव आता अमान्य करण्यात येत आहे. या विषयावर चर्चा करण्यास माझी हरकत नसल्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतींबरोबर चर्चा करुन वेळ आणि दिवस ठरवून देण्यात येईल.

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यानी "नांदेड जिल्हयात असलेल्या बाभळी धरणावर महाराष्ट्र शासनाच्या वतीने नियमानुसार तसेच केंद्रीय जल लवादाच्या निदेशानुसार रितसर सुरु असलेल्या कामाचा निषेध करण्याकरिता आंध्र प्रदेशमधील आमदारांनी काढलेल्या मोर्चामुळे तेथे निर्माण झालेला तणाव, तेथील परिस्थिती हाताळण्याकरिता नांदेडमधील आंध्र प्रदेश सीमेवर पोलिसांनी लागू केलेली संचारबंदी तसेच चंद्राबाबू संमर्थकानी महाराष्ट्र- आंध्र सीमेवरुन महाराष्ट्रात घुसण्याचा केलेला प्रयत्न. या विषयावर नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेले तीन-चार दिवस महाराष्ट्राच्या सीमेवर प्रचंड असा असंतोष असून तेथील वातावरणामध्ये तणाव निर्माण झालेला आहे. नांदेड जिल्हयातील बाभळी बंधाऱ्याला प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्याला फंडस देखील दिलेले आहेत. केंद्रीय जल लवादाच्या निदेशानुसार महाराष्ट्र सरकारने या बाभळी बंधाऱ्याचे काम सुरु केलेले आहे. त्यानंतर दिनांक 15 जुलै,2010 रोजी आंध्र प्रदेशच्या माननीय आमदारांनी श्री. चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला. खरे म्हणजे महाराष्ट्राच्या सीमेत येऊन बाभळी धरणाचे काम बंद पाडण्याची दादागिरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परवाच्या दिवशी ज्यावेळी हा विषय सभागृहात उपस्थित करण्यात आला त्यावेळी या राज्याच्या गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, जर त्यांनी अशा पध्दतीने महाराष्ट्राच्या सीमेत प्रवेश करुन त्याठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला असेल तर निश्चितपणे महाराष्ट्र सरकार त्यांच्या विरुध्द कारवाई करील. माननीय गृह मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे ती कारवाई केलेली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु श्री. चंद्राबाबू यांनी गेले दोन-तीन दिवस जामीन नाकारलेला आहे.काल पासून आंधप्रदेशमधील जनता महाराष्ट्राच्या सीमेवरील पोलिसांवर लाठीचार्ज करीत आहे.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड..

श्री. पांडुरंग फुंडकर ......

अनेक पोलीस त्या ठिकाणी गंभीर जखमी झालेले आहेत. अशा प्रकारची दादागिरी आपल्या महाराष्ट्रामध्ये घुसून बाहेरचे प्रांत करणार असतील तर त्याचा निषेध केला पाहिजे. बेळगावच्या बाबतीत आपण निषेध केलेला आहे. तसेच याचा निषेध केला पाहिजे. यासाठी ही 289 ची सूचना आम्ही दिलेली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, या सभागृहाने या सर्व घटनेचा निषेध करावा आणि आज सभागृहाचे कामकाज थांबवून या सर्व बाबीवर चर्चा घडवून आणावी अशा प्रकारची मागणी मी या 289 च्या प्रस्तावान्वये मी आपल्याला करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बाभळी बंधारा योग्य की अयोग्य हा आता या ठिकाणी विषयच नाही. कारण त्या बंधाऱ्याचे काम कायद्याच्या तरतुदीनुसार व्यवस्थितपणे चालू झालेले आहे. या बंधाऱ्याच्या प्रकरणामध्ये गेल्या दीड वर्षापूर्वी प्रचंड मोठे महाभारत श्री. चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशमधून घडविले होते. त्यांनी आंध्र प्रदेशमध्ये मोठा मोर्चा काढला होता. त्यावेळी वातावरण तापले होते आणि त्यावेळी संपूर्ण मराठवाडा एकत्र आला होता. मराठवाड्यातील सर्व पक्षांनी त्यावेळी एकत्र येऊन बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात आंध्र प्रदेशच्या भूमिकेला प्रखर विरोध आपल्या वतीने केला होता. आता श्री. चंद्राबाबू नायडू यांनी जी परिस्थिती निर्माण केलेली आहे ती राजकारणाकरिता आहे अशा प्रकारचे वक्तव्य आपल्या सभागृहाचे नेते राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी जाहीररीत्या केलेले आहे. आता या बंधाऱ्याच्या बाबतीत राजकीय दृष्ट्या परिस्थिती चिघळत चाललेली आहे. तांत्रिकदृष्ट्या तशी परिस्थिती नाही कारण हा विषय सर्वोच्च न्यायालयामध्ये आहे. आंध्र प्रदेशच्या वतीने हे प्रकरण न्यायालयामध्ये गेलेले आहे. आपण त्यासंदर्भात लढत आहोत. न्यायालयाने त्याला स्थगिती दिलेली नसल्यामुळे बंधाऱ्याचे काम पूर्ण क्षमतेने चालू आहे. त्यामुळे तोही विषय नाही. त्या ठिकाणी राजकीय घुसखोरीचा विषय निर्माण झालेला आहे आणि बरोबर अशी वेळ साधलेली आहे की, एका बाजूला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न पेटलेला आहे आणि दुसऱ्या बाजूला आंध्र प्रदेशने हा प्रश्न निर्माण केलेला आहे. जसे हिंदुस्थानवर बांगलादेश आणि पाकिस्तानने दोन्ही बाजूने यावे तशा प्रकारे महाराष्ट्रावर एक संकट निर्माण झालेले आहे आणि त्याला राजकीय प्रतिकार निर्माण झालाच पाहिजे अशी आमची भूमिका आहे. शासन यासंदर्भात कोणती ठाम भूमिका घेणार आहे ? कारण दिवसेंदिवस राजकीय अडचणी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. दिवाकर रावते ....

कशा निर्माण करता येतील आणि महाराष्ट्र सरकारला कसे कोंडीत पकडता येईल हा एक विषय वेगळ्या पध्दतीने हाताळला जात आहे. महाराष्ट्राची बदनामी मोठ्या प्रमाणावर आंध्र प्रदेशमध्ये सुरु आहे. आंध्र प्रदेशमधील वर्तमानपत्रातून मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रावर खापर फोडले जात आहे. श्री. चंद्राबाबू नायडू यांना कशा प्रकारे हीन वागणूक दिली जात आहे अशा प्रकारचा प्रचार त्या ठिकाणी केला जात आहे. त्याला आपण कोठे तरी समर्थपणे तोंड दिले पाहिजे ही भूमिका आहे. हे शासन राजकीय दृष्ट्या कसे पुढे जाणार आहे आणि त्यात विरोधी पक्ष म्हणून आमची काय भूमिका राहणार आहे हा चर्चेचा विषय आहे. हा विषय तातडीचा आहे. याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे लक्ष लागले आहे कारण आता केंद्र सरकार यामध्ये भाग घेणार आहे. आज आंध्र प्रदेश बंद आहे. त्यामुळे या दोन राज्यांमध्ये हा संघर्ष पेटत जाणार आहे. यासंदर्भात मी या सभागृहामध्ये औचित्याचा मुद्दा उपस्थित केला असताना माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी या ठिकाणी उत्तर दिले असले तरी सुध्दा त्यानंतर राजकीय दृष्ट्या वातावरण चिघळलेले आहे. म्हणून सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या संदर्भात आपण चर्चा उपस्थित करणे अगत्याचे आहे. मी आपल्याला विनंती करतो की, की आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारुन हा तातडीचा विषय सभागृहामध्ये चर्चेला घ्यावा. माझी शासनालाही विनंती आहे की, त्यांनी सुध्दा या चर्चेला ताबडतोब मान्यता द्यावी.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. या राज्याच्या सीमा भागावर होत असलेला जाणीवपूर्वक अन्याय तसेच सीमा प्रश्न या ठिकाणी चर्चेत असताना त्याबाबतीत दोन्ही सभागृहामध्ये आपण चर्चा घडवून आणली आणि महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेच्या भावना आपण त्यांच्यापर्यंत आणि देशापर्यंत पोहोचविल्या आणि त्याच वेळेला एक राजकीय हेतू लक्षात ठेऊन किंवा राजकीय गणिते मांडून माजी मुख्यमंत्री श्री. चंद्राबाबू नायडू यांनी या राज्यामध्ये घुसखोरी करुन जसे काही हे सगळे आमचेच आहे अशा प्रकारे त्याची भूमिका त्यांच्या कृतीतून ते दाखवित आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/ प्रथम श्री.बरवड 13:15

श्री.भाई जगताप....

मी माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांचे खरोखरच मनापासून अभिनंदन करीन. त्यांनी त्यांना सन्मानपूर्वक सांगितले की, आपण तोंडी तुमची हमी दिली तरी आम्ही तुम्हाला सन्मानाने वागवू. परंतु त्यांच्या डोक्यामध्ये राजकीय गणिते आहेत. तेथे दीड महिन्यांनी 12 ठिकाणी पोट निवडणूक होणार आहे ते लक्षात घेऊन संपूर्ण देशाचे लक्ष कसे वेधता येईल, ही जी त्यांची राजकीय भूमिका आहे त्याला आमचा विरोध आहे. या धरणाचे काम व्यवस्थितपणे चालू आहे. सुप्रीम कोर्टाला यामध्ये गैर वाटले असते तर सुप्रीम कोर्टाने त्या बांधकामाला स्थगिती दिली असती. परंतु सुप्रीम कोर्टाने सुध्दा या बंधा-याच्या कामाला स्थगिती दिलेली नाही. राज्याचे माजी मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याचा कारभार केलेला आहे. त्यांच्या काळातील ही बाब राज्यासमोर आणि देशासमोरही आलेली आहे. अशा परिस्थितीत राजकीय भूमिकेने प्रेरित होऊन त्यांनी हा विषय उकरुन काढलेला आहे. त्यांचा हा प्रयत्न महाराष्ट्रावर अन्याय करणारा आहे. या संपूर्ण घटनेचा निषेध करुन या सभागृहात सर्वंकष चर्चा व्हावी आणि महाराष्ट्राची भूमिका, महाराष्ट्राची भावना देशापर्यंत आणि सुप्रीम कोर्टापर्यंत पोहोचावी, यासाठी ही चर्चा घडवावी अशी आमची आग्रहाची मागणी आहे. या चर्चेसाठी तास, दीड तास नाही तर लागेल तेवढा वेळ द्यावा अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सभागृहासमोर नियम 289 चा प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी व त्यावरील चर्चा घडवावी अशी विनंती करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाभळी बंधा-याच्या निमित्ताने आंध्र प्रदेशमधील तेलगू देसमचे नेते श्री.चंद्राबाबू नायडू यांनी व त्यांच्या समर्थकांनी महाराष्ट्रात कायद्याचे उल्लंघन करुन, घुसखोरी करुन आपल्या राज्याच्या सीमेवर हैदोस घालून तेथील कायदा व सुव्यवस्था बिघडविलेली आहे. एवढेच नव्हे तर त्या परिसरातील वातावरण तप्त झालेले आहे. तेथे कोणत्याही क्षणी काहीही होऊ शकते. श्री.चंद्राबाबू नायडू हे येताना अनेक चॅनेलच्या व्हॅन आणि पत्रकारांचा तांडा घेऊन

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

आले आहेत. महाराष्ट्र आपल्यावर कसा अन्याय करीत आहे हे प्रसार माध्यमासमोर दाखवून महाराष्ट्राची बदनामी करण्याचे काम सुरु आहे.  संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे की, आपल्या शासनाने त्यांची उत्तम बडदास्त ठेवलेली आहे.  त्यांना ए.सी.रुम ते दारु पर्यंत सर्व काही पुरविले आहे.  त्यांची राहण्याची, जेवणाची व दारु पुरविण्याची सोय केलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्याठिकाणी दारु पुरविली जाते हे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना कसे समजले ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी सांगतो.  त्या लोकांना चिकन, मटन व दारु सगळया गोष्टी तेथे पुरविल्या जात आहेत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी बोलताना दारु हा शब्द वापरला आहे तो शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येत आहे. (अडथळा)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, त्यांना या सर्व गोष्टी शासनाने पुरविल्या असे मला म्हणावयाचे नाही तर त्याठिकाणी जे लोक आहेत त्यांनी त्या आणलेल्या आहेत. ते तेथून फक्त 10 कि.मी.अंतरावर आहेत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे बोलत आहेत.  मी त्यांना एकच विनंती करतो की, त्यांच्याकडे जी काही माहिती आहे त्याचे त्यांनी पुरावे द्यावेत. त्याठिकाणी अमुक दारुची बाटली पुरविली, ती अमूक अमूक व्यक्तीने पाहिली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नारायण राणे....

त्याबाबतचा कोणताही पुरावा नसताना त्यासंबंधीची माहिती सभागृहाला सांगणे इष्ट नाही. राज्याच्या महत्वाच्या प्रश्नासंबंधी सभागृहामध्ये प्रस्ताव मांडलेला आहे. त्यास वेगळया दिशेला कलाटणी देणे योग्य होणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी जे काही शब्दप्रयोग केलेले आहेत ते कामकाजातून काढून टाकावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ते शब्द काढून टाकण्यास मी आधीच सांगितलेले आहे.

श्री. विनायक मेटे : मी मुद्दामहून काही बोलायचे म्हणून बोलत नाही. तरीही माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे मी माझे शब्द मागे घेतो. मला हे सांगायचे आहे की, त्या ठिकाणी श्री. चंद्राबाबू नायडू आणि त्यांच्या सहकार्यांची उत्तम बडदास्त ठेवली जात आहे. असे असताना आंध्रप्रदेशच्या वर्तमानपत्रातून महाराष्ट्राची बदनामी करणारी छायाचित्रे प्रसिध्द केली जात आहेत. दूरचित्रवाहिन्याद्वारे ते खाली झोपले असल्याचे दाखविण्यात येत आहे. महाराष्ट्र सरकार कर्नाटकच्या आमदारांना कशी अमानुष वागणूक देत आहे हे तेथील लोकांच्या मनावर बिंबविले जात आहे. यामुळे महाराष्ट्राची बदनामी होत आहे. बाभळी बंधा-यामुळे महाराष्ट्रातील जनतेला दिलासा मिळू नये यासाठी त्यांनी अडवणुकीचे धोरण चालविलेले आहे. बाभळी बंधारा हा महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. म्हणून माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर या सभागृहामध्ये चर्चा होणे अतिशय महत्वाचे असल्यामुळे त्यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे मी समर्थन करीत आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी :या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर आणि अन्य सदस्यांनी नियम 289 अन्वये अत्यंत महत्वाचा विषय या सभागृहात चर्चेला आणलेला आहे. बाभळी बंधारा हा महाराष्ट्राचा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे.श्री. चंद्राबाबू नायडू हे आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांनी आपल्या राज्यात जरुर राजकारण करावे. परंतु नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथील बाभळी बंधा-याच्या ठिकाणी कोणालाही काहीच माहिती न देता एकदम उपटसुंभासारखे येऊन तेथील वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. श्री. चंद्राबाबू नायडू हे एकटे आले असते तर त्यांना याबाबतीत काही राजकारण करायचे नाही, त्यांना केवळ भेट द्यायची आहे असे आम्ही समजू शकलो असतो.त्या बंधा-याला भेट देण्यासाठी राज्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

शासनाने त्यांना जरुर परवानगी दिली असती. ही चर्चा होत असताना राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री हे देखील श्री. चंद्राबाबू नायडू यांच्याशी फोनवर बोलले आणि त्यांना सांगितले की, तुम्हाला काही बोलायचे असेल, चर्चा करायची असेल तर महाराष्ट्रामध्ये यावे किंवा पाहिजे तर दिल्लीला बसून चर्चा करुया. परंतु कोणत्याही चर्चेला सामोरे न जाता श्री. चंद्राबाबू नायडू हे आपल्या बरोबर खासदार, आमदार आणि प्रमुख कार्यकर्त्यांचा लवाजमा घेऊन दुस-या राज्यात जाऊन अशा प्रकारे राजकीय तणावाचे वातवरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतील तर पहिल्या प्रथम मी श्री. चंद्राबाबू नायडू आणि त्यांच्या बरोबर आलेल्या लोकांचा या सभागृहामध्ये तीव्र निषेध करतो. त्यांचा या राज्यामध्ये काहीही संबंध नसताना अशा पध्दतीने राजकारण करणे हे अत्यंत चुकीचे आहे. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे आणि अन्य सहका-यांनी ज्याला समर्थन दिलेले आहे त्या प्रस्तावावर या सभागृहामध्ये चर्चा व्हावी आणि या सभागृहाच्या माध्यमातून श्री. चंद्राबाबू नायडू आणि त्यांच्या सहका-यांना समज द्यावी अशी विनंती करतो.

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यासंदर्भात शासनाने आजच्या आज निवेदन करावे असे निदेश मी शासनाला देत आहे.

श्री. दिवाकर रावते : या प्रस्तावावर आजच चर्चा झाली पाहिजे.

**उपसभापती** : शासनाने निवेदन केल्यानंतर त्यावर चर्चा करता येईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य चर्चा घेण्याची मागणी करीत असतात)

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.25 ते 1.40 वाजेपर्यंत स्थगित झाली)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.43 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : आजच्या सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विधानपरिषद नियम 289 अन्वये "बाभळी, जिल्हा नांदेड येथील महाराष्ट्राच्या हद्दीतील जो पाटबंधारा प्रकल्प आहे तेथे आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री. चंद्राबाबू नायडू यांनी बेकायदेशीर शिरुन महाराष्ट्र राज्यात सुरु केलेले प्रक्षोभक वर्तन" या विषयावर आपल्या भावना मांडल्या आहेत. तसेच या विषयावर सत्तारुढ पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, ॲड गुरुनाथ कुलकर्णी, श्री. विनायक मेटे अशा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात सर्व सदनाच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती....

त्यामुळे आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री सन्माननीय श्री.चंद्राबाबू नायडू यांच्या प्रक्षोभक विधानांचा निषेध करून व महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करून महाराष्ट्र विधान परिषदेचे आजचे कामकाज निषेध म्हणून दिवसभरासाठी तहकूब करतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन मंगळवार, दिनांक 20 जुलै 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 6 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 20 जुलै 2010 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही